# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## १) अंजनगाव व दर्यापूर तालुक्यातील ७९ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजनाः-

अमरावती जिल्ह्यातील खारपाण पट्ट्यातील १५६ गांवे व दर्यापूर शहर आणि अंजनगाव शहर या सामुहिक पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती म.जी.प्रा. मार्फत करण्यात येते. सदर योजनेतील समाविष्ठ गावांना नियमीत व शुध्द पाणी पुरवठा होत असल्यामुळे अंजनगाव व दर्यापूर तहसील मधील उर्वरीत ७९ गावांनी १५६ गांवे व २ शहरे सामुहिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी मिळणेबाबत मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने ७९ गावांकरीता रु.६१.७२ कोटीची संपूर्णपणे गुरुत्वाव्दारे योजना तयार करण्यात आली असून दिनांक १३.८.२००८ रोजी शासनाकडून मंजूरी प्राप्त झाली आहे. दिनांक ०२.०२.२००९ पासून कामाची सुरुवात झ ाली असून ७०% कामे पूर्ण झाली आहेत व येत्या वर्षात योजना पूर्ण करण्याचे नियोजन असून मार्च २०१० पर्यंत सर्व गावात पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे. या योजनेतून सन २०२३ पर्यंत १४०२२४ लोकसंख्येस पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

## २) अचलपूर, चांदूर बाजार, भातकुली व अमरावती तालुक्यातील १०५ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनाः-

अचलपूर,चांदूर बाजार, भातकुली व अमरावती तालुक्यातील बहुतांश गांवे मुख्यतः खारपाणपट्टयातील असून गुणवत्ता बाधीत आहेत. ३५ वर्ष जुनी आसेगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असून या कालबाह्य झालेल्या योजनेमधून सद्यस्थितीत २५ गावांना पाणी पुरवठा करण्यात येते. ह्या जुन्या योजनेचा स्त्रोत पूर्णा नदी हा आटला असल्यामुळे सन १९८४ पासून कुपनलिकेव्दारे गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु ह्या गावांना पुरेसा पाणी उपलब्ध होत नाही.

सदर गावांचा व उपरोक्त चारही तालुक्यातील खारपाणपट्टयातील व गुणवत्ता बाधित गांवे असे एकूण १०५ गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढण्याकरिता पूर्णा धरण उद्भव घेवून संपूर्ण पणे गुरुत्वावर आधारित रु.१३४.८१ कोटीची योजना तयार करण्यात आली असून दिनांक १३.८.२००८ रोजी शासनाकडून मंजूरी प्राप्त झाली आहे. दिनांक १५.५.२००९ पासून कामाची सुरुवात झाली असून कामे प्रगतीत आहे व योजनेची ५०% कामे पूर्ण झाली आहे व येत्या १ ते दिड वर्षात योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या योजनेतून सन २०२३ पर्यंत २६५४०० लोकसंख्येस पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

## ३) सापन धरणावरुन २२४ गावांची प्रादेशिक पाणी पुवठा योजना :

अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील २२४ गावे रु. २२५ कोटी किंमतीची सापन धरणावरुन संपूर्णपणे गुरुत्वावर आधारीत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेला शासनाकडून नुकतिच तत्वतः मान्यता प्राप्त झाली असून सविस्तर आराखडे व अंदाजपत्रके बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. शासनाकडून मंजूरी मिळाल्यानंतर ३ वर्षात या योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या योजनेतून सन २०२६ ची अपेक्षित ३६०००० एवढया लोकसंख्येस पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

## ४) नांदगांव खंडेश्वर पाणी पुरवठा योजना :

नांदगांव खंडेश्वर करीता रु.९४१.६० लक्ष किंमतीची वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराला कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच जुना धामणगांव व लगतच्या नविन वस्त्या करिता रु.३३३.३५ लक्ष किंमतीची पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून न.प. धामणगांव कडून पाणी देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. जुना धामणगांव व लगतच्या नविन वस्त्यासाठी वर्धा नदी स्त्रोत घेवून नविन प्रस्ताव बनविण्याचे काम सुरु आहे.

## ५) अमरावती पाणी पुरवठा योजना टप्पा-२:-

अमरावती पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय दि. १६.११.९६ अन्वये प्रशासकीय मान्यता रु. ४३६५ लक्ष किंमतीस प्राप्त झालेली आहे. सदर योजनेची कामे सन २००४-०५ मध्ये पुर्ण करण्यात आली. सदर योजनेची कामे पूर्ण झाल्यावर तसेच मंजुर योजनेतील १२५० लक्ष शिल्लक असल्यामुळे वाढीव व नव्याने विकसीत झालेल्या भागाकरिता वितरण व्यवस्था टाकणे व पाण्याच्या टाक्या बांधणे आवश्यक होते. करीता सदर कामाचा सविस्तर प्रस्ताव रु. १२५० लक्ष किंमतीचा तयार करण्यात आला व ह्या कामाकरीता विदर्भ वैधानिक मंडळाकडून रु.५०० लक्ष व म.जी.प्रा.ने रु.७५० लक्ष कर्ज उपलब्ध करुन घ्यावयाचे होते. त्यापैकी विदर्भ विकास मंडळाकडून रु.५०० लक्ष प्राप्त झाले.

सदर योजनेतंर्गत २८.० कि.मी. लांब वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण झाली व साईनगर व महादेव खोरी येथील दोन पाण्याचे उंच टाक्यांची कामे प्रगतीपथावर आहे. गाडगे नगर येथील तिसरी पाण्याची टाकी बांधण्याकरिता निविदेची प्रक्रिया सुरु आहे तसेच वितरण व्यवस्थेसाठी लागणारे उर्वरित पाईपची मागणी करण्यात आली असून यावर्षी हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

## ६) अमरावती भुयारी गटार योजना:-

अमरावती शहराकरिता रु.१२३.०९ कोटीची भुयारी गटार योजना सन १९९९ मध्ये मंजुर झाली होती. योजनेच्या मंजूर आकृतीबंधानुसार शासकीय अनुदान रु. २८ कोटी व लोकवर्गणी पैकी रु.५.० कोटी खर्च करुन २०% कामे पूर्ण झाली आहे. म.न.पा.ने आवश्यक कर्ज न उभारल्यामुळे व लोकवर्गणी न भरल्यामुळे उर्वरित कामे पूर्ण करता आली नाही.

UIDSSMT अंतर्गत रु.१६०.०४ कोटीची अमरावती शहराकरिता भुयारी गटार योजना डिसेंबर २००६ मध्ये मंजुर झाली. निधीचा पहिला हप्ता म.न.पा.कडे प्राप्त झाला आहे. झोन क्र.४ व इतर मलवाहिन्या टाकणे, ४४ द.ल.घ.मी. क्षमतेचे मलशुध्दीकरण केन्द्र बांधणे या कामाच्या निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कंत्राटदारास कामाचा कार्यादेश देण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहे.

## ७) सुजल निर्मल अभियान:-

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे ५० वर्ष सन २०१० मध्ये पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्षापर्यंत नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापना संदर्भात पर्याप्त, गुणवत्तीपूर्ण सेवा, किफायतशिर सेवा शुल्का मध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रीक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट करुन ते राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्षापर्यंत साध्य करण्यासाठी महाराष्ट सुजल व निर्मल अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यानुषंगाने जिल्हयात खालील योजनांना मंजूरी मिळाली असून कामे प्रगतीपथावर आहे.

| | योजनेचे नांव | मंजूर किंमत |
|---|---|---|
| १) | अमरावती पाणी पुरवठा योजना | रु. ८७९.३० लक्ष |
| २) | चिखलदरा पाणी पुरवठा योजना | रु. ८७.७१ लक्ष |
| ३) | अंजनगाव पाणी पुरवठा योजना | रु. १३२.१४ लक्ष |

## ८) अमरावती शहराला २४ x ७ पध्दतीने पाणी पुरवठा करणे :

अमरावती पाणी पुरवठा योजने अंतर्गत अमरावती शहराकरिता २४x७ पध्दतीने (२४ तास) पाणी पुरवठा सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे अर्जून नगर व साईनगर झोन मध्ये २४x७ पध्दतीने पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

## ९) चांदूर बाजार वाढीव पाणी पुरवठा योजना:-

चांदूर बाजार शहरा करिता व शिरजगांव बंड गावाकरिता सन २००५ साली रु. १३४१.८६ लक्ष किंमतीची सन २०३२ वर्षाकरिता प्रकल्पित ४१३२१ लोकसंख्येकरिता वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. सदर योजनेची कामे पूर्ण करुन दि.२४.८.०७ रोजी योजना कार्यान्वित करण्यात आली. योजनेव्दारे दिनांक ३१.१२.०७ पर्यंत महा.जीवन प्राधिकरण मार्फत चाचणी स्वरुपात पाणी पुरवठा करण्यात आला व दि. १.१.२००८ रोजी नगर परिषदेकडे योजना हस्तांतरीत करण्यात आली. सध्या सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती नगर परिषद चांदूर बाजार मार्फत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर योजनेतून चांदूर बाजार व शिरजगांव बंड या गावातील २८००० लोकसंख्येस पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अमरावती

अमरावती जिल्हा एकुण **१४** तालुक्यात विभागला असुन **१६८७** इतकी गावे आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत आतापर्यंत **७२५** इतक्या योजना कार्यान्वित केल्या असून ग्रामपंचायतीला देखभाल व दुरुस्तीसह सुरळीत चालविण्यास हस्तांतरण झालेल्या आहेत. भारत निर्माण तथा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाअंतर्गत सन २०१०-११ व २०११-१२ अंतर्गत आराखडा मंजुर असुन त्याअंतर्गत उद्दिष्टये निश्चित झालेली आहे.

| अ. क्र. | तालुका | प्रस्तावित गावे संख्या | प्रस्तावित उपाययोजना | संभाव्य अंदाजित किमंत (लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ९ | नविन पुरक उद्‌भव घेणे, वाढीव साठवण क्षमता निर्माण करणे वितरण व्यवस्था पूनर्जीवित करणे इत्यादी | २०५ | जिल्हातील सहा तालुके अंजनगांव, चांदुर बाजार, अचलपूर, भातकुली, दर्यापूर, मोर्शी (अंशत:) ही मजिप्रा मार्फत विभागीय नळयोजने द्वारे हाताळण्यात येत असल्याने स्वंतत्र योजना संभाव्यता येणार नाहीत. |
| २ | तिवसा | १२ | | २६० | |
| ३ | नांदगाव खं. | ९ | | ३६० | |
| ४ | चांदुर रेल्वे | ७ | | २०० | |
| ५ | धामणगांव रेल्वे | ११ | | ३०० | |
| ६ | चिखलदरा | ५ | | ३३० | |
| ७ | धारणी | ५ | | ३३० | |
| ८ | वरुड | १६ | | ६४० | |
| ९ | मोर्शी | ११ | | २१० | |
| | **एकुण** | **८५** | | **२८३५** | |